# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. 06, वर्ष Year 2023, दिनांक Date 07/02/23

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, 1988 कलमे Sections 7, 12
 (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
 (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day सोमवार तारीख पासून Date from 16/1/23, वेळ Time ........, तारीख पर्यंत Date to 07/02/23, वेळ Time ........
 वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
 (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
 (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
 (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date 06/02/23, वेळ Time ........
 (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 43/23, तारीख Date 7/2/23, वेळ Time 23.20 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : प्रत्यक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ........, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ........
 (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name ........, ठिकाणाचे नंबर No. if any ........, गल्ली Ward ........, रस्त्याचे नाव Name of road ........
 जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Distt. ........, राज्य State ........
 (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Distt. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
 (a) नाव Name फैयाज अहमद चौगले (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name अहमद चौगले
 (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age 61 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9867791786
 (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation सेवानिवृत्त
 (g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
 (h) पत्ता : Address : गल्ली / सर्वे नं. Ward ........ घर / नाव नंबर House/Name No. ........ फोन /मो. नंबर Phone/Mob. No. ........ पॅन नं. ........ वोटर्स नं. Card No. ........
 चौगले हाऊस, 19-बी, चॅपेल रोड, लवली स्टोर जवळ
 रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place बांद्रा (प) गाव Village मुंबई 50 पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........
 तालुका Taluka ........ जिल्हा Distt. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
 Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
 (1) मोहन रामू राठोड, वय 42 वर्षे, दुय्यम अभियंता, इमारत व कारखाने पश्चिम विभाग मुंबई.
 (2) मोहम्मद शोएब मो. रजा खान वय 40 वर्षे (खाजगी इसम)

Scanned with CamScanner

यातील फिर्यादी श्री फैयाज अहमद चौगले वय 61 वर्षे, सेवानिवृत्त, रा.ठी. चौगले हाऊस, 41-बी, चॅपेल रोड, सवली स्क्वेअर जवळ, बांद्रा (प) मुं.50. यांचा स्वतंत्र पानावर जबाब नोंद करण्यात आला असुन त्यास नमुद गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

[signature]

समक्ष

[signature]

(शहानवाज मुल्ला)
पोलीस निरीक्षक
भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with CamScanner

जबाब दि. ०७/०२/२०२३

मी फैयाज अहमद चौगले, वय ६१ वर्ष, धंदा-सेवानिवृत्त, रा.ठी. चौगले हाऊस, ४९-बी, चॅपेल रोड, लवली स्टोअर जवळ, बांद्रा(प), मुंबई - ४०० ०५०, मो.नं. ९८६७७९१७८६, आधार कार्ड क्रमांक ३३३२ ८३८१ २००३

--------

मी वरील प्रमाणे असून मी २००७ पासून वरील पत्त्यावर माझे कुंटूबियासह रहात आहे. त्यापुर्वी मी बांद्रा (पुर्व), मुंबई येथे रहात होतो. माझे घरी मी व माझ्या दोन पत्नी, तसेच माझी मुले व नातवंडे रहात आहोत. माझा एक मुलगा नामे फहाद हा व्यवसायाने वकील असून, सैफ याचे कलिना येथे मोबाईल शॉप आहे. मुलगी नामे फरहा, फरहीन, रुक्सार, फिरदौस, रुक्सार अशा चार मुली असून रुक्सार हि लॅब टेक्निशियन असून फिरदौस सोडून सर्वांचे लग्न झालेले आहे. माझी सर्व मुले व मुली त्यांच्या परिवारासह माझेसोबत राहतात. माझे वर नमुद पत्यावर असलेले घर हे आम्ही अर्षद अजगर अली अन्सारी यांचेकडून २००७ मध्ये खरेदी केलेले आहे.

मला २०१२ मध्ये बृहन्मुंबई महानगर पालिका, एच पश्चिम विभागाकडून माझ्या घराच्या दुसरा मजला निष्कासित करणेकरीता नोटिस देण्यात आली होती. त्याबाबत दिंडोशी न्यायालयाकडून निष्कासन कारवाईस स्थगिती देण्यात आली होती. सदर प्रकरण मा.न्यायालयात प्रलंबित होते.

ऑक्टोबर २०२२ मध्ये मी हैदराबाद येथे माझे मेव्हण्याचे निधन झाल्यामुळे गेलो असताना बृहन्मुंबई महानगरपालिका, एच (पश्चिम) विभागाचे श्री. राठोड साहेब हे आमच्या घरी येवून त्यांना घराचे निरीक्षण करावयाचे असल्याचे सांगितले. मी घरी नसल्याने माझी मुलगी रुक्सार व माझा मुलगा फहाद यांनी श्री राठोड यांचेशी चर्चा करुन वडील आल्यानंतर कार्यालयात येवुन भेटतील असे सांगितल्यानंतर त्यावेळची कारवाई थांबविण्यात आली होती. मी हैदराबाद येथून परत आल्यानंतर श्री. राठोड साहेब यांना भेटलो असता, त्यावेळी त्यांनी मला न्यायालयाकडून देण्यात आलेल्या स्थगिती उठविण्यात आली असल्याची माहिती दिली. त्याचप्रमाणे माझे शेजारी कमर हसन ईब्राहिम सय्यद यांच्या ॲबियन्स बिल्डर ॲड डेव्हलपर्स यांचेकडून आमच्या बांधकामाबाबत तक्रार प्राप्त झाली असल्याची माहिती मला दिली. तदनंतर श्री. राठोड साहेब यांनी मला दुसऱ्या दिवशी कार्यालयात येणेबाबत सांगितले.

दुसऱ्या दिवशी मी कार्यालयात श्री. राठोड साहेब यांना जावून भेटलो असता त्यांनी मला त्यांचे कार्यालयातील राहुल जाधव साहेब यांचेशी भेट करुन दिली. त्यावेळी त्यांनी तुम्ही दोघांनी एकमेकांशी बोलून आपसात समेट करुन घ्या व त्यानंतर मला सांगा. त्यानंतर पुढील कार्यवाही करु असे संागितले. त्यानंतर नोटिस मिळणेपुर्वी श्री. राठोड यांनी माझेकडे सदर अर्जावर कारवाई न करणेकरीता रु.१०,००,०००/- रक्कमेची मागणी केली होती. परंतु माझ्या विनंतीनंतर त्यांनी रु.५,००,०००/- स्विकारण्याचे मान्य केल्याने मी वेळोवेळी टप्याटप्याने रु.५,००,०००/- रक्कम दिलेली आहे.

दिनांक १६/०१/२०२३ रोजी श्री. राठोड यांनी प्रत्यक्ष घरी आले व निष्कासनाबाबतची नोटिस दिली. त्यानंतर मी श्री. राठोड यांना त्यांच्या कार्यालयात जावून भेटलो व निष्कासन कारवाई थांबविणेबाबत विनंती केली. त्यावेळी श्री. राठोड साहेब यांनी घराच्या निष्कासन कारवाई थांबविणेकरीता माझेकडे रु. १५,००,०००/- रक्कमेची मागणी केली. त्यावेळेस मी सदर रक्कम देण्यास असमर्थता दर्शविली असता त्यांनी सर्वांना पैसे द्यावे लागणार असल्याचे मला सांगितले.

मुंबई महानगरपालिका, एच वेस्ट वार्ड, खार (पश्चिम), मुंबई येथील श्री. मोहन राठोड, दुय्यम अभियंता ( इमारत व कारखाने ) यांना लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक ०६/०२/२०२३ रोजी समक्ष हजर राहून लाप्रवि कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे स.पो.आ. अविनाश पोवार व पो.नि. शहानवाज मुल्ला यांना भेटुन श्री. राठोड यांनी लाचेची मागणी करीत असल्याबाबत माझी लेखी तक्रार अर्ज लिहून देण्यास सांगितले. त्यानुसार मी इंग्रजीमध्ये स्वहस्ताक्षरात लिहिलेला तक्रारी अर्ज सही करुन दिला.

त्यानंतर त्याच दिवशी शासकीय पंचासह पडताळणी करीता १८:३० वा. चे दरम्यान रवाना झालो. प्रवासा दरम्यान श्री.राठोड यांनी त्यांच्या मोबाईलवरुन मला फोन करुन त्यांच्या कार्यालयात येण्यास

Scanned with CamScanner

सांगीतल्याने श्री. राठोड साहेब यांचे कार्यालयामध्ये गेलो असता माझे व श्री. राठोड साहेब यांचेमध्ये माझे कामासंदर्भात चर्चा झाली. त्यावेळी लोकसेवक श्री. राठोड साहेब यांनी मला पैशांबाबत खुणेने विचारणा केली असता '' कल सुबह ग्यारा बजेतक मे हो जायेगा'' तसेच '' लेकीन कल कितना करु पहिले बता'' असे विचारले असता त्यांनी मला त्यांचे मोबाईलवर मला ९००००० असा आकडा दाखवला त्यावर मी ''नौ लाख ज्यादा हो जायेगा ना भाई ...... पाच लाख फिर बाद मे साडे तीन लाख रुपया. साडे आठ की बात हुई थी आपकी '' असे म्हंटल्यानंतर श्री. राठोड साहेब यांनी '' ठिक है साडे आठ दो.. कल कर दो '' असे सागितले. त्यांना मी सदर पैसे इथेच आणून देवू का असे विचारले असता त्यांनी '' वो मै नंबर देता हूं उसको आप दे देना'' असे सागितले. त्यानंतर श्री. राठोड साहेब यांनी सदर शोएब नामक व्यक्तीचा मोबाईल नंबर मला देवून त्याचेकडे पैसे देण्याबाबत मला सांगितले व शोएब याचेशी माझी ओळख करुन दिली.

मी दिनांक ०७/०२/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई कार्यालयास सकाळी १०.०० वाजता हजर झालो. माझे बचतीमधील रु.५०,०००/- लाच रक्कम सापळा कारवाई करीता वापरण्यास म्हणुन पो.नि. मुल्ला यांचेकडे दिली. व उर्वरित ०८ लाख रक्कम ही खेळण्यातील डमी नोटा वापरणार असल्याचे पो.नि मुल्ला यांनी सांगीतले. त्याप्रमाणे सर्व कार्यवाही पुर्ण करुन सापळा पथकासह श्री. राठोड यांच्या कार्यालयाकडे रवाना झालो. प्रवासा दरम्यान खाजगी इसम शोएब याचा फोन आला. त्यावेळी मी बँकेमधून पैसे घेवून येत असल्याचे त्यास सांगितले. बांद्रा पश्चिम नॅशनल कॉलेज येथे पोहोचलो असता पुन्हा शोएब याचा फोन आला असता शोएब यास नॅशनल कॉलेज, बांद्रा (प) येथे येण्यास सांगितले. त्यानुसार पोलीस पथक , दोन्ही पंच व मी सांगितलेल्या ठिकाणी चालत जावून थांबलो. काही वेळातच शोएब सदर ठिकाणी दुचाकीवर आला असता त्याला जवळच असलेल्या सीएसबी बँक, बांद्रा पश्चिम शाखा समोरील मोकळया जागेत जावून त्याने मागणी केल्याप्रमाणे आणलेली रक्कम दिली. सदर लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मी माझे डोक्यावरील टोपी काढुन पुर्वनियोजीत इशारा केला. पुर्वनियोजीत इशारा मिळताच खाजगी इसम शोएब यास पोलीस पथकाने ताब्यात घेतले. त्यावेळी मी माझे मोबाईल वरुन श्री. राठोड साहेब यांना शोएब याचेकडे पैसे दिल्याचे सांगितले, त्यावर त्यांनी ठिक आहे असे सांगितले.

शोएब यास ताब्यात घेतल्यानंतर श्री. राठोड साहेब यांचा शोएब याचे मोबाईलवर फोन आला असता शोएब याने श्री.राठोड यांना फोनवर पैसे मिळाल्याचे सांगितले. तेथून आम्ही श्री. राठोड साहेब यांचे कार्यालयात गेलो असता पोलीस पथकाने श्री. राठोड यांना ताब्यात घेतले.

तरी, मुंबई महानगरपालिका, एच (वेस्ट) वार्ड, खार (पश्चिम), मुंबई येथील दुय्यम अभियंता (इमारत व कारखाने) श्री मोहन रामू राठोड यांनी माझे घरावर निष्कासन कारवाई न करण्याकरीता माझेकडे दि. ०६/०२/२०२३ रोजी ९ लाख रूपये लाचेची मागणी केली व पडताळणीवेळी तडजोडीअंती रू ८,५०,०००/- लाचेची रक्कम खाजगी इसम शोएब याचेमार्फतीने स्विकारण्याचे मान्य केले व दि. ०७/०२/२०२३ रोजी लोकसेवक मोहन रामू राठोड यांचे सांगणेप्रमाणे खाजगी इसम श्री. शोएब यांने रु.८,५०,०००/- रूपये रक्कम स्विकारली म्हणुन माझी श्री.मोहन रामू राठोड व खाजगी इसम शोएब यांचेविरूध्द कायदेशिर तक्रार आहे.

मुंबई महानगरपालिका, एच (वेस्ट) वार्ड, खार (पश्चिम), मुंबई . येथील दुय्यम अभियंता (इमारत व कारखाने) श्री मोहन रामू राठोड व खाजगी इसम शोएब यांचेशी माझे कोणतेही पूर्व वैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्याघेण्याचे व्यवहार नाहीत.

माझा वरील जबाब हा मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केला असून तो मला मराठीतुन वाचून हिंदीतून समजावुन सांगितला असता तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

( शहानवाज मुल्ला ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with CamScanner

(१२)

2495812

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ............ तात्काळ
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकुण मुल्य ............ लाचेची रक्कम 8,50,000/-
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक :
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील कॉलम क्र. 07 मधील आलोसे
यांनी यातील फिर्यादी यांना त्यांचे घराचे निष्कासन न करण्याकरीता
त्यांचे कडून रु. 9,00,000/- रकमेची लाचेची मागणी केली व तडजोडीअंती
खासगी इसमामार्फत रु. 8,50,000/- स्विकारण्याचे मान्य केले व त्यांचे सांगण्यानुसार
खासगी इसमाने रु. 8,50,000/- शासकीय पंचासमक्ष स्विकारले म्हणून आलोसे
मोहन रामू राठोड व खाजगी इसम शोएब मो. रजा खान यांच्या विरुद्ध
ला.प्र.वि. गुर.क्र. 06/23 कलम 7,12 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि 1988 अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पो. नि. शहानवाज मुल्ला

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ............ Rank............ No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ............ (3) Transferred to P.S ............, District ............ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ............ शहानवाज मुल्ला
पदनाम Rank ............ पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.मुं.
तपासिक अं. चा कोड. क्र.
Posting
Code No. of I. O. ............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner